पुण्य नगरी

# रिग्रो बायोसायन्सेसला यूएसएफडीएने दिली मान्यता

**मुंबई** : रिग्रो बायोसायन्सेस या भारतकेंद्री जागतिक बायोटेक कंपनीने त्यांच्या 'ऑसग्रो' या आघाडीच्या उत्पादनाच्या दुसऱ्या टप्प्यातील चाचणीसाठी यूएसएफडीएची मान्यता प्राप्त झाल्याचे जाहीर केले आहे. ऑसग्रो हे एक ऑर्फन ड्रग (सरकारच्या सहाय्याशिवाय ज्याचे उत्पादन शक्य होत नाही असे औषध) असून अमेरिकी बाजारपेठेत ऑस्टिओनेक्रॉसिसवर प्रभावी उपचार करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. याबाबत रिग्रो बायोसायन्सेस प्रायव्हेट लिमिटेडचे कार्यकारी संचालक व प्रमुख वैज्ञानिक अधिकारी सत्येन संघवी म्हणाले, ऑस्टिओनेक्रॉसिस किंवा अॅव्हास्क्युलर नेक्रॉसिसवरील उपचारांसाठी वापरले जाणारे जगातील पहिले जीवशास्त्रीय बोन सेल थेरपी उत्पादन विकसित करण्याच्या दृष्टीने घेण्यात आलेल्या प्री-आयएनडी बैठकीत (नवीन औषधाच्या तपासाच्या पूवी घेतली जाणारी बैठक) रिग्रो बायोसायन्सेसला यूएसएफडीएकडून सकारात्मक फीडबॅक प्राप्त झाला आहे. रुग्णांच्या छोट्या संख्येवर क्लिनिकल चाचणीचा दुसरा टप्पा घेण्यासाठी प्री-आयएनडी फीडबॅक आणि शिफारस प्राप्त होणे ब्रॅण्डसाठी खूपच प्रोत्साहक आहे आणि कंपनी आता आयएनडी फायलिंगवर काम करत आहे. गेल्या पाच वर्षांहून अधिक काळात देशभरातील २०० रुग्णालयांतू ऑसग्रोबद्दल आलेल्या सुरक्षितता व परिणामकारता यांविषयीच्या डेटाचा आधार या सकारात्मक भावनेला आहे.

**Smart Mumbai**
Page No.2 May 24, 2022